# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ-संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक : 12.10.2026** **वार : सोमवार**

---

**श्रीसूक्तपठण**

नवरात्रोत्सवानिमित्त सारसबागेतील श्री महालक्ष्मी मंदिरात आयोजित सामूहिक श्रीसूक्त आणि श्री गणपती अथर्वशीर्ष पठणाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शंखनाद, 'जय माता दी'चा जयघोष आणि सामूहिक मंत्रपठणामुळे मंदिर परिसर भक्तिमय झाला होता.

**स्टॅनफोर्ड-एल्सेव्हियर**

नुकत्याच जाहीर झालेल्या जागतिक दर्जाच्या 'स्टॅनफोर्ड-एल्सेव्हियर २०२६' यादीत जगातील दोन टक्के शास्त्रज्ञांमध्ये पुण्यातील ९२ संशोधकांनी मानाचे स्थान मिळवले आहे. यामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, आयसर, एन. सी. एल. , आय. यू. सी. ए. ए. आणि ए. एफ. एम. सी. यांसारख्या नामांकित संस्थांमधील शास्त्रज्ञांचा समावेश आहे. खगोलशास्त्र, भौतिकशास्त्र, वैद्यकशास्त्र आणि जैवतंत्रज्ञान या क्षेत्रांतील त्यांच्या उल्लेखनीय संशोधनाची जागतिक पातळीवर दखल घेण्यात आली आहे.

**MPSC**

पुण्यात सुरू असलेलं एमपीएससी परीक्षार्थींचं आंदोलन स्थगित करण्यात आलं आहे. राज्यमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळानं काल आंदोलकांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. एमपीएससीमध्ये आमूलाग्र बदल करण्यासाठी राज्य सरकारनं समिती स्थापन केली असून, एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांची समितीच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान विवेक भीमनवार यांनी चौकशी पूर्ण होईपर्यंत अध्यक्षपदावर कार्यरत न राहण्याचा निर्णय समाजमाध्यमांद्वारे जाहीर केला.

**होर्डिंग्ज**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणानं अनधिकृत जाहिरात फलकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित यंत्रणेचा वापर सुरू केला आहे. या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून संपूर्ण पीएमआरडीए क्षेत्रातील प्रत्येक गावातील फलकांचं सर्वेक्षण पूर्ण करण्यात आलं आहे. अनधिकृत फलकांची ओळख पटल्यावर संबंधितांवर कारवाई केली जाईल असं पीएमआरडीएच्या अतिरिक्त आयुक्त के. मंजुलक्ष्मी यांनी सांगितलं.

**सिंहगड ध्वज**

पुणे महापालिकेच्यावतीनं किल्ले सिंहगडावर शंभर फुटी भगवा ध्वज उभारण्यात येणार आहे. महापौर मंजूषा नागपुरे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबवला जाणार आहे. नागपुरे यांनी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या परिसरातील जागेची पाहणी केली. सुरक्षितता आणि संरचनात्मक बाबींचाही आढावा घेण्यात आला. हा ध्वज महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाचं आणि स्वराज्याच्या शौर्यपरंपरेचं प्रतीक ठरेल, असं नागपुरे यांनी सांगितलं.

**दुष्काळग्रस्त मदत**

सामाजिक बांधिलकी जपत पुण्यातील भाजी विक्रेते किरण वनवे यांनी सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळग्रस्तांना आपल्या उत्पन्नातील ५० टक्के वाटा देण्याची घोषणा केली आहे. सोलापूरच्या तुळशी गावातील कठीण परिस्थिती पाहून त्यांनी हा निर्णय घेतला. पुणेकरांनी यंदा दिवाळीत शेतकऱ्यांना धान्य किंवा आर्थिक मदत करावी, असं आवाहन वनवे यांनी केलं असून, गेल्या वर्षी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या या कार्याचं कौतुक केलं होतं.

**'सिनर्जी स्कूल ऑफ कॉमर्स'**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नता नसतानाही 'सिनर्जी स्कूल ऑफ कॉमर्स' या महाविद्यालयानं विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्याचं उघडकीस आलं आहे. हे महाविद्यालय नोंदणीकृत पत्त्यावर अस्तित्वात नसल्याचं विद्यापीठाच्या चौकशीत समोर आलं आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठ प्रशासनानं विद्यार्थ्यांना या महाविद्यालयात प्रवेश न घेण्याचं आवाहन केलं आहे.

**आरोग्य शिबिर**

सेवा संकल्प अभियानांतर्गत कुरकुंभ इथल्या सेवा दवाखान्याच्यावतीनं नुकतंच एका खासगी आस्थापनात आरोग्य जनजागृती आणि समुपदेशन शिबिर आयोजित करण्यात आलं होतं. या वेळी कर्मचाऱ्यांना आरोग्याची काळजी, नियमित तपासणी, कर्मचारी राज्य विमा योजनेच्या सुविधांची माहिती देण्यात आली तसंच व्यसनमुक्त जीवनशैलीचा अवलंब करण्याचं आवाहन करण्यात आलं.

**फॅन्सी नंबर प्लेट**

नवीन दुचाकी वाहनांसाठी आकर्षक, पसंतीचा नोंदणी क्रमांक आरक्षित करण्याची ऑनलाईन सेवा उद्या दुपारी 12 वाजल्यापासून सुरू होणार असल्याचं पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयानं पत्रकाद्वारे कळवलं असून कार्यालयामध्ये ऑफलाईन पद्धतीने शुल्क स्वीकारले जाणार नसल्याचंही प्रशासनानं म्हटलं आहे.

**कॅश्युरिना**

पुणे जिल्ह्यातील भोर येथे २८ आणि २९ नोव्हेंबर रोजी 'कॅश्युरिना ॲडव्हेंचर एक्स या साहसी शर्यतीचे आयोजन करण्यात आलं आहे. या स्पर्धेत सायकलिंग, धावणे, ट्रेकिंग आणि कयाकिंग अशा प्रकारांचा समावेश आहे. यामध्ये १२० किलोमीटरच्या मुख्य शर्यतीचा समावेश असून, ती २४ तासांत पूर्ण करावी लागणार आहे. स्पर्धेतील विजेत्यांना एकूण चार लाख रुपयांची पारितोषिके आणि पदके दिली जाणार आहेत.

**मधूकांबीकर निधन**

मराठी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेत्री आणि लावणी सम्राज्ञी मधू कांबीकर  यांचं आज पुण्यात प्रदीर्घ आजारानं निधन झालं. त्या ७३ वर्षांच्या होत्या. कांबीकर यांनी आपल्या ४ दशकांहून अधिक काळाच्या कारकिर्दीत लावणी आणि लोककलेला एक वेगळी ओळख मिळवून दिली. त्यांनी ७५ हून अधिक चित्रपटांमध्ये आणि अनेक नाटकांमध्ये काम केलं होतं. 'शापित', 'झपाटलेला', 'एक होता विदूषक', 'सतीची पुण्याई', 'ह्योच नवरा पाह्यजे' आणि 'रावसाहेब' यांसारख्या चित्रपटांतील त्यांच्या भूमिका खूप गाजल्या. त्यांच्या जाण्यानं मराठी मनोरंजन सृष्टीवर आणि लोककला विश्वावर शोककळा पसरली आहे.

**जलतरण**

पुण्यातील नांदे येथील ध्रुव ग्लोबल स्कूलच्या ५८ विद्यार्थ्यांनी सलग २४ तासांच्या रिले जलतरण मॅरेथॉनमध्ये सहभाग घेत आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये विक्रमाची नोंद केली आहे.

**हवामान**

पुणे आणि शहर परिसरात आज आकाश निरभ्र होतं तर कमाल तापमान 35 अंश सेल्सिअस आणि किमान तापमान 19 पूर्णांक 5 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही तापमानात फारसा बदल संभवत नसल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**